# मैत्री

पुण्यात लग्नासाठी म्हणून आलेली माझी एक मैत्रीण परवाच मला भेटून गेली. जाताना सासूबाईंचा निरोप घेता घेता म्हणाली, "या वयात मैत्रिणीची खूप गरज असते, म्हणूनच यावेळी मी हिला ठरवून भेटले." हे वाक्य ऐकलं आणि मनात एक विचार आला. वाटलं, याच वयात का ? मैत्रीची गरज खरंतर प्रत्येक वयात असते. त्या त्या वयात आपण एकमेकांशी वागतो ती मैत्री तर असते, पण आपण मात्र त्यांना वेगवेगळी नावे आणि वेगवेगळ्या नात्यांची लेबलं लावतो.

आता हेच बघा ना - माझी सर्वात आधी मैत्री झाली ती माझ्या लहान भावाशी. आम्ही दोघं आजीकडे लहानाचे मोठे झालो, तेव्हा दोघंच तर होतो एकमेकांना ! माझी कितीतरी गुपितं मी त्याला सांगितली होती आणि प्रामाणिकपणे त्याने ती जपली पण होती. मग शाळेत मैत्रिणी झाल्या. आपल्या शेजारी बसते तीच आपली मैत्रीण या भावनेने माझी मैत्रीची वाटचाल चालू झाली. हळूहळू आमचा चार-पाच जणींचा एक ग्रुप झाला आणि शाळेच्या मधल्या सुट्टीत आम्ही खूप धमाल करायला लागलो.

कॉलेजला मी ठाण्याला आले आणि त्या शाळेच्या मैत्रीत खंड पडला पण ते धागे इतके चिवट होते की अजूनपर्यंत त्याची वीण कधी उसवली नाही. आपल्याच सोसायटीतील एक मुलगी आपल्याच कॉलेजला आहे हे कळल्यावर तिच्याबरोबर जातायेता माझी मैत्री झाली. ती मात्र पुढे अनेक वर्षे राहिली.

मग आयुष्यात मित्रांची फेज आली, कॉलेजला अनेक मित्र झाले. पुढे पुढे तर मी त्यात इतके बुडाले की जो कोणी माझ्याशी बोलेल तो माझा मित्र असंच समजायला लागले. खरे मित्र, खोटे मित्र, जवळचे मित्र, लांबचे मित्र हे सर्व समजायचे ते वयच नव्हते. याच टप्प्यावर एक खरा मित्र भेटला, तशी त्याची माझी ओळख अगदी एक-दोन महिन्यांची, पण मैत्रीचे रुपांतर प्रेमात होऊन तो माझा जीवनसाथी झाला. नव्या नवलाईचा संसार थोडासा जुना झाला आणि माझ्यातला मैत्रीचा झरा पुन्हा वाहू लागला. सांसारिक जबाबदाऱ्या हळूहळू पार पडत असतानाच सोशल मिडीया नावाचं नवीन दार माझ्यासाठी उघडलं गेलं.

या सोशल मीडियामुळे अनेक नव्या-जुन्या मित्रमैत्रिणींशी मी पुन्हा जोडले गेले. ज्याच्याशी शाळेत असताना एकही शब्द न बोललेले मी आणि गेली अनेक वर्ष अमेरिकेत राहीलेला तो, अचानक भेटलो आणि आमची मैत्री दुथडी भरून वाहू लागली. जणू काही मधली वर्ष त्यात वाहून गेली.

माणसांप्रमाणेच नवनवीन आधुनिक गोष्टींशीही आता मैत्री होत होती. मोबाईल, लॅपटॉप अशा गोष्टी हाताळताना जेव्हा काही मला अडते तेव्हा “अरे यार, कितीवेळा सांगायचे तुला" असं माझा लेक मला म्हणतो तेव्हा तो मित्राच्या भूमिकेत शिरलेला असतो. काळानुसार मामे, चुलत, मावस सगळीच

बहीणभावंडं मित्रमैत्रिणींसारखी वागायला लागली आहेत. माझ्या मावशांचे फोन आले आणि ख्याली खुशाली विचारून झाली की नात्याचे लेबल कधी गळून पडते आणि आम्ही मैत्रिणी कधी होतो हे कळतच नाही. एखादा सिनेमा, एखादं उत्तम पुस्तक याच्यावर नवऱ्याबरोबर चर्चा करताना त्याच्यातला जुना मित्र पुन्हा डोकावू लागतो. अशी ही मैत्री तुम्हाला आयुष्यात ठायी ठायी भेटते.

सारं काही उत्तम चालू असतं आणि माझं कधीतरी 'आहे मनोहर तरी' सारखं होतं, एकटेपण हवंहवंसं वाटतं, निराशा दाटून येते पण त्याच वेळी माऊलींचे शब्द कानी पडतात,

जे खळांची व्यंकटी सांडो
तयां सत्कर्मीं रती वाढो
भूतां परस्परे जडो
मैत्र जीवांचे !!!!!

अचानक अंध:कार नाहीसा होऊन काहीतरी लख्ख प्रकाशतं, माझ्यातलं मैत्रेय पुन्हा जागं होतं. हात मोबाइलच्या दिशेने जातो, व्हॉट्सअॅप आणि एफबी वर आलेल्या पोस्टनां रिप्लाय करण्यासाठी मी पुन्हा एकदा सज्ज होते.

**शिल्पा इनामदार आर्ते**